# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 31/01/2020 (शुक्रवार)
# (दुपार)

---

## अपहार करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. एमआयडीसी बोरी – दि. 29/01/2020 चे 14:00 वा. दरम्यान फिर्यादी अनिल रामाजी हरीनखेडे, वय 23 वर्ष, रा. बुट्टीबोरी हे पो.स्टे. एमआयडीसी बोरी हद्दीत त्रिवेणी कंपनी, बोरी मध्ये एचआर मॅनेजर असून तेथे आरोपी नामे– क्र. 1) मोहम्मंद जूबेर, रा. फारूख नगर(चालक), टेकानाका नागपूर, 2) दिलीप रॉय(चालक), रा. गरोबा, मैदान नागपूर व 3) शेरेश्वर रामलाल मालोत(सिक्यूरिटी सूपरवायजर), रा. बुटीबोरी हे सीजी–04/जेसी– 8785 क्रमांकाच्या ट्रकचे चालक व कंपनीचे सिक्यूरिटी सूपरवायजर आहेत. फिर्यादी यांना कंपनीच्या मालात तफावत दिसून येत असल्याने घटना तारीख वेळी आरोपीतांनी सीजी–04/जेसी– 8785 क्रमांकाच्या ट्रकमध्ये प्रत्येक 500 किलो असा एकुण कि. 1,000/–रू.चा जा.आय. वायर कि. 40,000/–रू. चा मुद्येमाल अपहार करून फिर्यादीचा विश्वासघात केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 408, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोक तरमळे 9923699185 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :–अंतर्गत 6 कि.मी. मौजा खैरलांजी येथे दिनांक 29/01/2020 चे 15:00 वा. ते 16:00 वा. दरम्यान बोलेरोचा चालक अज्ञात आरोपीने त्याच्या ताब्यातील भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–40/एटी– 1552 क्रमांकाचा मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार नामे– सागर गणपतराव सुपारे, वय 23 वर्ष हा गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी प्रथम पिएचसी कुही व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती असता दिनांक 29/01/2020 चे 17:45 वा. डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर मोटरसायकल सोबती सौरभ पारधी हा जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईस्तारी भोंडुजी सुपारे, वय 58 वर्ष, रा. वैभव नगर, प्लॉट क्र. 161, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुय आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादवराव कुंभरे 7448123937 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :- अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर मौजा पोही येथे दिनांक 30/01/2020 चे 10:00 वा. पुर्वी मनोज हिवराज आगरे, वय 21 वर्ष, रा. पोही याने राहत्या घरी अज्ञात कारणाने लोखंडी पाईपला नायलॉन दोरीने गळफास घेवून खालीदोरी तुटून बसलेल्या मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- विनोद शिवरामजी चुलपार, वय 40 वर्ष, रा. पोही यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ दांडेकर 7972856916 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर